# डाळिंब

**पिकाचे नाव :** डाळिंब
**शास्त्रीय नाव :** पुनिका ग्रॅनाटम
**कुळ :** पुनिकासी
**लागवड अंतर :** 12x8, 14x8, 16x8 फूट
**वाण :** भगवा, सुपर भगवा, गणेश, सोलापूर लाल, शरद किंग

**डाळींबाचे गुणधर्म :** जागतिक स्तरावर भारत आणि चीन हे डाळिंब उत्पादनात आघाडीवर आहेत. डाळिंब फळ हे अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा समृद्ध स्त्रोत आहे, त्यात अनेक औषधी गुणधर्म आणि पौष्टिक मूल्य देखील आहेत.
**माती:** डाळिंबाची लागवड वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीवर करता येते. परंतु चिकणमाती, मध्यम खोल, पाण्याचा चांगला निचरा होणारी, जमिनीचा सामू 7.5 एवढा असलेली जमीन लागवडीसाठी निवडावी. डाळिंब पिक हे जमिनीचा सामू 7.5-8.2 असलेल्या मातीत तग धरू शकते.
**हवामान:** डाळिंब हे उष्ण आणि कोरडे हवामान आवश्यक असलेले उप-उष्णकटिबंधीय फळ आहे. हे अवर्षण सहनशील आहे, फळांच्या विकासासाठी 38 डिग्री सेल्सिअस तापमानात तग धरू शकते, अतिशय कमी तापमान देखील सहन करू शकते.
**उत्पादन:** व्यावसायिक दृष्ट्या उत्पादन हे लागवडी नंतर तिसऱ्या वर्षी चालू होते साधारण 12-15 किलो प्रति झाड एवढे पहिल्या बहारात उत्पादन मिळू शकते. त्यानंतर 15-20 किलो प्रति झाड उत्पादन मिळू शकते.
**कीड:** फळ शोषक पतंग, फळ पोखरणारी आळी, फुलकिड, मावा, पांढरी माशी, मिलीबग
**रोग:** जिवानुजन्य करपा, तेल्या, मर रोग, फळकुज, फळांवरील व पानावरील बुरशीजन्य ठिपके (सर्कोस्पोरा, ड्रेचलेरा, ऍन्थ्रेकनोज, स्कॅब, अल्टरनेरिया)



# डाळिंब
## सोलापूर लाल

**वाण:** सोलापूर लाल
**लागवड दिनांक:** 12/07/2023
**लागवड अंतर:** 12 x 8 फुट
**लागवड क्षेत्र:** 4.49 R
**एकून रोपसंख्या:** 51

**सोलापूर लाल जातीचे वैशिष्टे:** सोलापूर लाल हे वाण भगवाx [(गणेश x नाना) x दारू] या वानांपासून विकसित करण्यात आलेले आहे. ही लवकर फळ देणारी आणि लवकर परिपक्व होणारी जात आहे, फळांचा परिपक्वता कालावधी 160-165 दिवस (भगवा पेक्षा 15-20 दिवस आधी परिपक्व होतो). आकार भगवा या वाणा पेक्षा थोडा लहान आहे. ही बायोफोर्टिफाइड जात आहे, ज्याचा रंग गडद लाल, बियाणे इतर जातींपेक्षा टणक आहे. हे वाण तेलकट डाग/बॅक्टेरियल ब्लाइटला संवेदनाक्षम आहे.

**उत्पादन:** व्यावसायिक दृष्ट्या या वानाचे उत्पादन लागवडीनंतर 2 ते 3 वर्षात चालू होते साधारण 130-140 फळे/झाड, 35-39 किलो/झाड.



# डाळिंब
## जैन टिशू कल्चर

**वाण:** जैन टिशू कल्चर
**लागवड दिनांक:** 26/07/2023
**लागवड अंतर:** 12 x 8 फुट
**लागवड क्षेत्र:** 4.49 R
**एकून रोपसंख्या:** 51

**जैन टिशू जातीचे वैशिष्टे:** मजबूत आणि विकसित मुळ प्रणाली, रोग व कीटक आणि नीमाटोड्सपासून मुक्त रोप. बायो फोर्टिफाइड, पहिले पीक लागवडीनंतर २४-२६ महिन्यांत कापणीसाठी तयार होते.

**उत्पादन:** लागवडीनंतर 2-3 वर्षांनी उत्पादन सुरु होते, 3 वर्षानंतर व्यावसायिक उत्पादन सुरु होते 30 टन/हेक्टर/वर्ष उत्पादन.



# डाळिंब

## भगवा

**वाण:** भगवा
**लागवड दिनांक:** 06/11/2023
**लागवड अंतर:** 12 x 8 फुट
**लागवड क्षेत्र:** 4.49 R
**एकून रोपसंख्या:** 51

**भगवा जातीची वैशिष्टे:** भगवा जातीमध्ये मोठ्या आकाराची फळे (400 ग्रॅम), आकर्षक गडद भगवा रंग, गडद लाल कातडी. मऊ बियाणे, फळांची दर्जेदार टिकवण क्षमता, लांब वाहतुकीसाठी योग्य. फळे तडकण्यास कमी संवेदनाक्षम आणि थ्रिप्स आणि पानांवरील डाग आणि फळांवरील डागांना कमी प्रमाणात संवेदनाक्षम. फळांच्या पक्वतेचा कालावधी फळधारणे पासून 170-190 दिवस.

**उत्पादन:** लागवडीनंतर 2-3 वर्षांनी उत्पादन सुरु होते, 3 वर्षांनी व्यावसायिक उत्पादन सुरु होते 22.50 टन/हे/वर्ष उत्पादन.

